शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड परिसरातील पदव्युत्तर मुलांचे वसतिगृहाचे पहिल्या मजल्याचे बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयांस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत. (रु.४,८८,५०,०००/-)

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्र.एडीआर-२०१५/प्र.क्र.१२३/१५/आयु-२

गो.ते.रुग्णालय आवार, ९ वा मजला,

मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

दिनांक :- १४ मार्च, २०१८

वाचा :-१) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.आसंमुं/शाआमनां/मुलांचे वसतीगृह / प्र.मा./२०१४-२०१५/ आयु-४(२)/११२८८, दिनांक ०४.०९.२०१५.

२) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.आसंमुं/शाआमनां/ मुलांचे वसतीगृह/ प्र.मा./२०१६/ आयु-४(२)/१७४३१, दिनांक १४.१२.२०१६.

प्रस्तावना :-

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड येथील महाविद्यालयात सद्या अस्तित्वात असलेल्या मुलांचे वसतीगृह हे ५० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे असून, महाविद्यालयाचे विद्यार्थी संख्या १०० झाल्यामुळे कमी पडत आहेत. अस्तित्वात असलेले वसतीगृह मुलांच्या राहण्यासाठी अपुरे पडत असुन, त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात गैरसोय होत असून, बऱ्याच विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या बाहेर रहावे लागते. त्यामुळे सदरहू बांधकाम करणे आवश्यक असल्याबाबत अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, संचालक, आयुष यांना, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी सादर केलेल्या,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड येथील महाविद्यालयाच्या परिसरामधील पदव्युत्तर मुलांचे वसतीगृहाचे पहिल्या मजल्याचे बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडे रु.४,४१,६६,१८८/- यांस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत स्पष्ट केलेल्या सदर कामास, सोबत जोडलेल्या Recapitulation sheet प्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या असून रुपये ४८८.५०/- लक्ष इतकी रक्कम परिगणित करण्यात आली आहे.तसेच खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करण्याच्या अटीस अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दिनांक ०७/०७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	बांधकामाचे नांव	अंदाजित रक्कम
१)	शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील महाविद्यालयाच्या परिसरामधील पदव्युत्तर मुलांचे वसतीगृहाचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे.	रु.४,८८,५०,०००/-

सदर बांधकामासाठी येणारा खर्च वार्षिक योजना - शासकीय आयुर्वेद महाविद्यालय आणि संलग्नित रुग्णालयाची बांधकामे अंतर्गत उपलब्ध अनुदानातूनच करण्यात येऊन खालील नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या निधीतून भागविण्यात यावा व दर्शविण्यात यावा.

मागणी क्रमांक - एच - ८

प्रधान लेखा शीर्ष - ४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

०३ - वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन

१०१ - आयुर्वेद

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजना

(००)(०१) - मोठी बांधकामे (४२१० ००७९)

(००)(०२) - अस्थापना खर्च (४२१० ००८८)

(००)(०३) - हत्यारे व संयंत्रे यावरील खर्च (४२१० ००९७)

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौ.सं.क्र.२९/इमा-३,दि.०९.०१.२०१८ अन्वये, प्राप्त सहमतीनुसार तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दिनांक १७ एप्रिल,२०१५ (वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उप विभाग पाच अ.क्र.१ नियम १३४) नुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३१६१८०६५०४०१३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Dhananjay Mahesh Nayak
Date: 2018.03.16 18:11:48 +05'30'

(ध.म.नायक)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.

२) अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड.

३) महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) महालेखापाल-१, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

५) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड.

६) कोषागार अधिकारी, नांदेड

७) कक्ष अधिकारी, व्यय-१३/अर्थसं-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) कक्ष अधिकारी (इमारती-३), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) कक्ष अधिकारी, अलेप, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई-०१.

१०) निवड नस्ती (आयु-२)